


# NEWS CLIPINGS

# Sakal – 04/03/2023

सकाळ



**विटा :** येथे डॉ. व्ही. बी. पाटील यांचा सत्कार करताना डॉ. सुरेश साळुंखे, डॉ. राजेंद्र मोरे आदी.

## रयत सेवकांचे जीवन समृद्ध : डॉ. सुरेश साळुंखे

**विटा :** कर्मवीरांच्या विचार कार्याचा वारसा आजही वटवृक्षाप्रमाणे विस्तारत आहे. रयत शिक्षण संस्थेतील प्रत्येक सेवकाने कर्मवीर आण्णांचा वैचारिक वारसा जपला आहे. अशा सेवकांच्या निस्पृह कार्यानिच रयत शिक्षण संस्था उतरोत्तर प्रगती करीत आहे." असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. सुरेश साळुंखे यांनी व्यक्त केले. रयत शिक्षण संस्थेचे बळवंत कॉलेज येथे सेवक कल्याण समिती आयोजित डॉ. व्ही. बी. पाटील यांच्या निवृत्ती सत्कार समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे होते. यावेळी डॉ. व्ही. बी. पाटील, प्रा. डॉ. अरविंद तपासे, प्रा. डॉ. सी. आर. बोबडे, डॉ.आशिष सरतापे, प्रा.सारिका पाटील, ग्रंथपाल डॉ.पाटील यांनी मनोगत व्यक्त केले.प्रास्ताविक प्रा.डॉ.दिनेश वाघुंबरे यांनी केले. प्रा. राणी चव्हाण यांनी आभार मानले.

Sangli, Main
04/03/2023 Page No. 8

# Sakal - 31/12/2022

सकाळ

## प्रसाद पाटीलचे तायक्वांदोत यश



प्रसाद पाटील

**विटा :** येथील बळवंत कॉलेजचा खेळाडू प्रसाद पुंडलिक पाटील याने शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय तायक्वांदो स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळविला. त्याची अमृतसर (पंजाब) येथे होणाऱ्या अखिल भारतीय आंतरविद्यापीठ तायक्वांदो स्पर्धेसाठी निवड झाली आहे. सागर पाटील यांचा सत्कार प्राचार्य राजेंद्र मोरे यांच्या हस्ते झाला.

Sangli, Sangli-Today
31/12/2022 Page No. 2

## Sakal - 23/11/2022

सकाळ

# पाश्चात्यांचे अंधानुकरण घातक

## डॉ. मोरे : स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर व्याख्यानमाला



विटा : बळवंत महाविद्यालयात बोलताना डॉ. नंदकुमार मोरे. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, रघुराज मेटकरी व अन्य.

**विटा, ता. २२ :** "भौतिक समृद्धीच्या अट्टहासापोटी माणूस नातेसंबंधापासून दुरावत आहे. निकोप समाजजीवनाच्या निर्मितीसाठी प्रत्येकाने आत्मचिंतन करणे आवश्यक आहे," असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठातील मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले.

बळवंत कॉलेज व शिवाजी विद्यापीठ पुरस्कृत स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर व्याख्यानमालेप्रसंगी 'समाजजीवनाचे भान विसरतोय काय?' या विषयावर ते बोलत होते. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे होते.

डॉ. राजेंद्र मोरे म्हणाले, "सकारात्मक समाजजीवनाच्या निर्मितीसाठी आत्मचिंतन आवश्यक आहे. आधुनिक विज्ञान-तंत्रज्ञानातील सर्वंकष क्रांतीचे उपयोजन मानवी सुखासाठी असणे अभिप्रेत होते. मात्र प्रत्यक्षात तसे घडत नाही. स्पर्धा, मोबाईल संस्कृती, राजकीय विसंगती, आधुनिकीकरण-जागतिकीकरणाचा अतिरेकीपणा यामुळे मानवी जीवनात उदासीनता आली आहे."

"आधुनिक काळात समाज कृत्रिम जीवन जगत आहे. ही व्यवस्था बदलण्याची जबाबदारी आजच्या महाविद्यालयीन तरुण पिढीवर आहे," अशा शब्दांत प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी समाजातील बदललेल्या विघातक गोष्टींवर प्रकाशझोत टाकला.

विद्यार्थ्यांनी रेखाटलेल्या चित्रांच्या प्रदर्शनाचे उद्‌घाटन डॉ. मोरे यांच्या हस्ते झाले. ज्येष्ठ कवी रघुराज मेटकरी, प्रा. वनिता होवाळे, उपप्राचार्य प्रा. डी. टी. देवकाते, डॉ. श्रेया पाटील, प्रा. एस. एम. जाधव उपस्थित होते. मराठी विभागप्रमुख डॉ. दिनेश वाघुंबरे यांनी प्रास्ताविक केले. प्रा. राणी चव्हाण व डॉ. संध्या पोतदार यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सुनील बुद्धनावर यांनी आभार मानले.

Sangli, Sangli-Today
23/11/2022 Page No. 3

# Sakal - 31/12/2022

सकाळ

## सागर तामखडेला कुस्तीत सुवर्णपदक



सागर तामखडे

**विटा :** बळवंत कॉलेजचा कुस्तीपटू सागर सदाशिव तामखडे (एम. ए. १) याने वेणूताई चव्हाण कॉलेज (कऱ्हाड) येथे झालेल्या शिवाजी विद्यापीठ आंतरविभागीय कुस्ती स्पर्धेत ९७ किलो वजन गटात शिवाजी विद्यापीठात प्रथम क्रमांकासह सुवर्णपदक मिळवले. खेळाडूंचा महाविद्यालयाच्यावतीने सत्कार करण्यात आला.

Sangli, Sangli-Today
31/12/2022 Page No. 2

# Sakal - 10/08/2022

सकाळ

# मानवी साखळीने अमृत महोत्सवी बोधचिन्ह

## विट्यातील बळवंत महाविद्यालयात स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त कार्यक्रम सुरू

**विटा, ता. ९ :** येथे भारतीय स्वातंत्र्याच्या ७५ व्या अमृत महोत्सव दिनानिमित्त विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. 'हर घर तिरंगा' ही मोहीम खानापूर तालुक्यासह विटा शहरामध्ये चित्ररथाच्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे.

जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशानुसार प्रशासनाच्या माध्यमातून प्रांत अधिकारी संतोष भोर व तहसीलदार ऋषिकेत शेळके यांच्या देखरेखाली नियोजनबद्ध कार्यक्रम घेतले जात आहेत. याच पार्श्वभूमीवर येथील बळवंत महाविद्यालयाच्या क्रीडांगणावर विद्यार्थी-विद्यार्थिनींच्या मानवी साखळीने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी बोधचिन्ह बनवले.



**विटा : बळवंत महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मानवी साखळीने स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवी बोधचिन्ह तयार केले.**

बळवंत कॉलेज, विटा हायस्कूल आणि संजय भगवानराव ज्युनिअर कॉलेज, आदर्श कॉलेज, महात्मा गांधी विद्यामंदिर आदी शाळा, कॉलेजच्या विद्यार्थ्यांनी पारंपरिक पद्धतीने व देशभक्तीपर वेशभूषा करून भारतमातेला सलामी देण्यासाठी बळवंत कॉलेजच्या प्रांगणामध्ये नेत्रदीपक बोधचिन्ह तयार केले. विटा पोलिस ठाणे वरिष्ठ अधिकारी, बळवंत महाविद्यालय एनसीसी विद्यार्थी सर्वांनी एकसाथ तिरंग्यास सलामी देऊन आज भारतीय स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवास शानदार सुरवात केली.

उपविभागीय अधिकारी भोर यांच्या हस्ते ध्वजवंदन झाले. यावेळी तहसीलदार ऋषिकेत शेळके, उपविभागीय पोलिस अधिकारी श्रीमती पद्मा कदम, मुख्याधिकारी मनोजकुमार देसाई, पोलिस निरीक्षक संतोष डोके, रयत संस्थेचे दक्षिण विभाग अध्यक्ष माधवराव मोहिते, बळवंत कॉलेजचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, पोलिस उपनिरीक्षक पांडुरंग कन्हेरे, सहायक पोलिस निरीक्षक दत्तात्रय कोळेकर, उपमुख्याधिकारी स्वप्निल खामकर, पोलिस उपनिरीक्षक दत्तात्रय शेंडगे, विटा हायस्कूलचे प्राचार्य संजय साठे आदी उपस्थित होते.

आरिनी गुळवणी हिने पियानोद्वारे राष्ट्रगीत सादर केले. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी संयोजन केले. देविदास जाधव यांनी सूत्रसंचालन केले.

Sangli, Main
10/08/2022 Page No. 5

# Sakal - 07/09/2022

सकाळ

# शिक्षण देण्याचे अनमोल कार्य शिक्षकांकडूनच : संतोष भोर

**सकाळ वृत्तसेवा**

विटा, ता. ६ : शिक्षक म्हणजे ज्ञानाचा सागर आहे. प्रत्येक व्यक्तीच्या आयुष्यातील पहिले शिक्षक म्हणजे माता-पिता. विद्यार्थी जेव्हा शाळा, विद्यालय, महाविद्यालय येथे प्रवेश घेतो, तेव्हा त्याच्या आयुष्यातील खऱ्या शिक्षणाला प्रारंभ होतो. हे शिक्षण देण्याचे अनमोल कार्य करणारे शिक्षक खरे मार्गदर्शक आहेत, असे प्रतिपादन विट्याचे उपविभागीय अधिकारी संतोष भोर यांनी व्यक्त केले.ते रयत शिक्षण संस्थेचे बळवंत कॉलेजमध्ये स्टाफ वेलफेअर कमिटी आयोजित शिक्षक दिनानिमित्त सत्कार समारंभात बोलत होते.अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे होते.



विटा : बळवंत महाविद्यालयात शिक्षकदिनी मार्गदर्शन करताना संतोष भोर. व्यासपीठावर राजेंद्र मोरे, दिनेश वाघुंबरे, जाधव व अन्य.

स्टाफ वेलफेअर कमिटी प्रमुख डॉ. दिनेश वाघुंबरे यांनी प्रास्ताविक केले. यावेळी निवृत्त झालेल्या आणि संस्थेच्या विकासात मोलाचे योगदान देणा-या शिक्षक व शिक्षकेतर सेवकांचा सत्कार करण्यात आला.

प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, महात्मा जोतिराव फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महान शिक्षणतज्ज्ञांच्या शिक्षणविषयक विचारकार्याचा आढावा घेतला. कुंभार यांनी मनोगत व्यक्त केले. यावेळी माजी उपप्राचार्य प्रा. पांडुरंग शितोळे, यू. एन. पवार, विलास पाटील आदी मान्यवर उपस्थित होते. डॉ. श्रेया पाटील, प्रा. रंजना बागल, प्रा.प्रियांका शिंदे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. अरविंद तपासे यांनी आभार मानले.

Sangli, Sangli-Today
07/09/2022 Page No. 2

# Sakal - 16/03/2023

सकाळ



विटा : बळवंत संशोधन महोत्सवाचे उद्घाटन करताना डॉ. अर्जुन वाघ. या वेळी प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे आदी.

## बळवंत संशोधन महोत्सवास प्रतिसाद

विटा : येथील बळवंत कॉलेजमध्ये आयोजित बळवंत संशोधन महोत्सवास चांगला प्रतिसाद मिळाला. महोत्सवाचे उद्घाटन डॉ. अर्जुन वाघ, प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांच्या हस्ते झाले. संशोधन महोत्सवात कला शाखेतील ७० विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदविला. विद्यार्थ्यांनी या महोत्सवांत विविध विषयांवरील पोस्टर सादरीकरण केले. मराठी साहित्यातील सोनेरी पान-कुसुमाग्रज, पेटंट कसे मिळवावे?, साहित्यातील समाजसुधारक- साने गुरुजी, पर्यावरण : समस्या व उपाययोजना, हिंदी भाषाविज्ञान, महाराणा प्रताप : एक वीरपुरुष, मानसशास्त्रीय समुपदेशन, संसदीय संरचना, नवीन शैक्षणिक धोरण, अर्थसंकल्प - २०२३, इंग्रजी व्याकरण यांसारख्या विविध विषयांवर विद्यार्थ्यांनी पोस्टरचे सादरीकरण केले. परीक्षक म्हणून डॉ. वाघ आणि प्रा. डॉ. दिनेश वाघुंबरे यांनी काम पहिले. डॉ. मल्लिकार्जुन बंदारे यांनी प्रमुख स्वागत केले. प्राचार्य डॉ.राजेंद्र मोरे यांचे मार्गदर्शन केले.

Sangli, Sangli-Today
16/03/2023 Page No. 4

# Sakal - 20/11/2022

सकाळ

## बळवंत महाविद्यालयात खो-खो स्पर्धा उत्साहात

**विटा, ता. १९ :** येथील बळवंत महाविद्यालयात सांगली विभागीय मुलांच्या खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सहायक पोलिस निरीक्षक पवार, शेडगे, देणगीदार व सामाजिक कार्यकर्ते रणजित पाटील, प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, सांगली विभगीय सचिव प्रा. हर्षकुमार पाचोरे यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले.

प्रा. सुरेश जाधव यांनी प्रास्ताविक केले. तुकाराम माळी, योगेश तोडकर, शिवसागर पाटील, सचिन शिंदे, उमाकांत साळुंखे, निखिल पाटील, दत्ता, सूरज, हणमंत, गणेश, श्रेयस गाडगीळ यांनी पंच प्रमुख म्हणून काम पाहिले.

एन. डी. पाटील रात्र महाविद्यालयाने (सांगली) प्रथम, पतंगराव कदम महाविद्यालय (सांगलीवाडी) द्वितीय, केडब्ल्यूसी महाविद्यालय (सांगली) तृतीय, एमपीपी महाविद्यालयाने (बोरगाव) चतुर्थ क्रमांक मिळविला. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, कार्यालयीन अधीक्षक प्रमोद थोरावडे, यशवंत चव्हाण, पाचोरे, एन. डी. बनसोडे, तुपे, सचिन पाटील, प्रा. एस. एम. जाधव यांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण झाले. प्रा. सुजाता पितांबरे यांनी आभार मानले.

Sangli, Sangli-Today
20/11/2022 Page No. 2

# Sakal - 14/12/2022

सकाळ

## सेवा योजनेमुळे व्यक्तिमत्त्व घडते : ऋषिकेत शेळके

**विटा** : समाजकार्य करताना बंधन नसते. राष्ट्रीय सेवा योजना एक युवा चळवळ आहे, असे प्रतिपादन तहसीलदार ऋषिकेत शेळके यांनी केले. बळवंत कॉलेज व शिवाजी विद्यापीठाची (कोल्हापूर) राष्ट्रीय सेवा योजना यांच्यातर्फे देविखिंडी येथे विशेष श्रमसंस्कार शिबिर झाले, त्यावेळी ते बोलत होते. सरपंच रुक्मिणी निकम, उपसरपंच विक्रम निकम, सूर्याजी माळी, बबन निकम, महादेव शिंदे, दादासाहेब निकम, अरुण केगार, धनाजी घाडगे यांची उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य मोरे म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी समाजसेवा करणे हा राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्देश असून विद्यार्थ्यांनी सतत प्रयत्न राहिले पाहिजे.'' निकम, घाडगे यांनी मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा कार्यक्रम अधिकारी प्रा. पी. ए. गवळी यांनी प्रास्ताविक केले. श्रीमती ए. एम. बनसोडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. संतोष कदम यांनी आभार मानले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. एम. बंदारे, प्रा. प्रशांत गांजवे, प्रा. श्रीमती आर. बी. माळी व ग्रामस्थांची उपस्थिती होती.

Sangli, Main
14/12/2022 Page No. 2

# Sakal - 20/11/2022

सकाळ

## बळवंत महाविद्यालयात खो-खो स्पर्धा उत्साहात

**विटा, ता. १९ :** येथील बळवंत महाविद्यालयात सांगली विभागीय मुलांच्या खो-खो स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. सहायक पोलिस निरीक्षक पवार, शेडगे, देणगीदार व सामाजिक कार्यकर्ते रणजित पाटील, प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, सांगली विभगीय सचिव प्रा. हर्षकुमार पाचोरे यांच्या उपस्थितीत उद्घाटन झाले.

प्रा. सुरेश जाधव यांनी प्रास्ताविक केले. तुकाराम माळी, योगेश तोडकर, शिवसागर पाटील, सचिन शिंदे, उमाकांत साळुंखे, निखिल पाटील, दत्ता, सूरज, हणमंत, गणेश, श्रेयस गाडगीळ यांनी पंच प्रमुख म्हणून काम पाहिले.

एन. डी. पाटील रात्र महाविद्यालयाने (सांगली) प्रथम, पतंगराव कदम महाविद्यालय (सांगलीवाडी) द्वितीय, केडब्ल्यूसी महाविद्यालय (सांगली) तृतीय, एमपीपी महाविद्यालयाने (बोरगाव) चतुर्थ क्रमांक मिळविला. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, कार्यालयीन अधीक्षक प्रमोद थोरावडे, यशवंत चव्हाण, पाचोरे, एन. डी. बनसोडे, तुपे, सचिन पाटील, प्रा. एस. एम. जाधव यांच्या उपस्थितीत पारितोषिक वितरण झाले. प्रा. सुजाता पितांबरे यांनी आभार मानले.

Sangli, Sangli-Today
20/11/2022 Page No. 2

# Sakal-14/12/2022

सकाळ

# सेवा योजनेमुळे व्यक्तिमत्त्व घडते : ऋषिकेत शेळके

**विटा :** समाजकार्य करताना बंधन नसते. राष्ट्रीय सेवा योजना एक युवा चळवळ आहे, असे प्रतिपादन तहसीलदार ऋषिकेत शेळके यांनी केले. बळवंत कॉलेज व शिवाजी विद्यापीठाची (कोल्हापूर) राष्ट्रीय सेवा योजना यांच्यातर्फे देविखिंडी येथे विशेष श्रमसंस्कार शिबिर झाले, त्यावेळी ते बोलत होते. सरपंच रुक्मिणी निकम, उपसरपंच विक्रम निकम, सूर्याजी माळी, बबन निकम, महादेव शिंदे, दादासाहेब निकम, अरुण केगार, धनाजी घाडगे यांची उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे अध्यक्षस्थानी होते. प्राचार्य मोरे म्हणाले, ''विद्यार्थ्यांनी समाजसेवा करणे हा राष्ट्रीय सेवा योजनेचा उद्देश असून विद्यार्थ्यांनी सतत प्रयत्न राहिले पाहिजे.'' निकम, घाडगे यांनी मनोगत व्यक्त केले. राष्ट्रीय सेवा कार्यक्रम अधिकारी प्रा. पी. ए. गवळी यांनी प्रास्ताविक केले. श्रीमती ए. एम. बनसोडे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. संतोष कदम यांनी आभार मानले. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी डॉ. एम. एम. बंदारे, प्रा. प्रशांत गांजवे, प्रा. श्रीमती आर. बी. माळी व ग्रामस्थांची उपस्थिती होती.

Sangli, Main
14/12/2022 Page No. 2

# Sakal - 10/12/2022

सकाळ

# शरद पवार नवसंकल्पक नेतृत्व

## डॉ. सुधीर भोंगळे : विट्यातील बळवंत महाविद्यालयात राज्यस्तरीय चर्चासत्र



विटा : बळवंत महाविद्यालयात बोलताना डॉ. सुधीर भोंगळे, सरोज पाटील, माधवराव मोहिते, डॉ. राजेंद्र मोरे व मान्यवर.

**विटा, ता. ९ :** "ज्येष्ठ नेते शरद पवार मराठी मातीतले एक अनमोल रत्न आहे. उत्तम श्रोते, शिस्तबद्धता, चौफेर वाचन, समयसूचकता, प्रभावी निर्णयक्षमता, दूरदृष्टी, नवसंकल्पक अशा विविध गुणवैशिष्ट्यांनी परिपूर्ण असणारे पवारांचे व्यक्तिमत्त्व आजच्या तरुणांसाठी आदर्श आहे," असे प्रतिपादन पुणे येथील सामाजिक कार्यकर्ते डॉ. सुधीर भोंगळे यांनी व्यक्त केले.

ते येथील बळवंत महाविद्यालयात राज्यशास्त्र व इतिहास विभाग आयोजित 'रयत शिक्षण संस्थेची वाटचाल आणि शरद पवार साहेब' यावरील राज्यस्तरीय चर्चासत्रामध्ये प्रमुख वक्ते म्हणून बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्य सरोज पाटील होत्या. दक्षिण विभागीय अध्यक्ष माधवराव मोहिते, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य एम. बी. शेख यांची प्रमुख उपस्थिती होती. सरोज पाटील म्हणाल्या, "पुरोगामी विचारांच्या कुटुंबातील खोड्या काढणारे शरद पवार ते देशविकासासाठी लाखो लोकांचे संघटन बांधणारा आणि सामान्य माणसाच्या हितासाठी अग्रेसर असणारे शरद पवार हा एका वादळाचा प्रवास आहे." प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी प्रास्ताविक केले. राज्यशास्त्र विभागप्रमुख डॉ. मल्लिकार्जुन बंदारे यांनी परिचय करून दिला. यावेळी प्राचार्य डॉ. के. एच. शिंदे, प्राचार्य डॉ. एल. डी. कदम, विक्रांत पाटील, डॉ. डिसोझा, विलास शिंदे, रघुराज मेटकरी, साठे, संपतराव पवार आदी उपस्थित होते. डॉ. संध्या पोतदार यांनी सूत्रसंचालन केले. इतिहास विभागप्रमुख डॉ. राजकुमार मरे यांनी आभार मानले.

Sangli, Main
10/12/2022 Page No. 102

# Sakal-11/10/2022

सकाळ

# तरुण पिढीसाठी वाङ्‌मयीन संस्कार उपयुक्त : डॉ. हुसे

**सकाळ वृत्तसेवा**

विटा, ता. १० : "माणसा-माणसांतील संवाद कमी होत चालला आहे. वाचनसंस्कृतीही धोक्यात आली. मोबाईल आणि सोशल मीडियाच्या अतिरेकामुळे भरकटलेल्या पिढीवर वाचनसंस्कार रुजविणे गरजेचे आहे. महाविद्यालयीन स्तरावर विद्यार्थ्यांवर वाङ्‌मयीन संस्कार घडविण्याचे मौलिक कार्य वाङ्‌मय मंडळ करीत असते. भाषा विषयातून रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध आहेत.

प्रसारमाध्यमे, जाहिरात, प्रकाशन व्यवसाय, याशिवाय स्पर्धा परीक्षांमध्ये सुद्धा प्रादेशिक भाषांना महत्त्वाचे स्थान आहे," असे प्रतिपादन 'तिफण' या त्रैमासिकाचे मुख्य संपादक डॉ. शिवाजीराव हुसे यांनी व्यक्त केले. ते बळवंत कॉलेज येथे मराठी पदवी व पदव्युत्तर विभाग आयोजित वाङ्‌मय मंडळाचे उद्‌घाटन समारंभात बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे होते. यावेळी प्रमुख मान्यवरांचा हस्ते 'अक्षरवैभव' या भित्तिपत्रकाचे अनावरण करण्यात आले.



**विटा : बळवंत महाविद्यालयात वाङ्‌मय मंडळाच्या उद्‌घाटन समारंभात बोलताना डॉ. शिवाजीराव हुसे. व्यासपीठावर डॉ. राजेंद्र मोरे व अन्य.**

विद्यार्थ्यांनी कविता सादर केल्या. त्याचबरोबर यावेळी कर्मवीर जयंती व सत्यशोधक समाज स्थापनेच्या शतकोत्तर सुवर्ण महोत्सवानिमित्त आयोजित वक्तृत्व, तसेच रांगोळी स्पर्धेतील विजेत्या स्पर्धकांना मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देण्यात आली. मराठी विभागप्रमुख डॉ. दिनेश वाघुंबरे यांनी प्रास्ताविक केले. पल्लवी सावंत यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. सुनील बुद्धनावर यांनी आभार मानले. प्रा. वनिता होवाळे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

Sangli, Sangli-Today
11/10/2022 Page No. 6

sakal -09/08/2022

सकाळ



विटा : सायकल रॅलीत सहभागी संतोष भोर, ऋषिकेत शेळके, मनोज देसाई, डॉ. राजेंद्र मोरे, स्वप्निल खामकर आदी.

# विट्यात सायकल रॅलीला प्रतिसाद

**विटा :** येथील तहसील कार्यालय, उपविभागीय अधिकारी कार्यालय, नगरपालिका व बळवंत कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने आझादी का अमृत महोत्सवानिमित्त 'हर घर तिरंगा' मोहीम प्रचार प्रसिद्धीकरिता विटा शहरातून सोमवारी सकाळी सायकल रॅलीचे आयोजन करण्यात आले होते. ही सायकल रॅली बळवंत कॉलेज येथून निघून पुढे शिवाजी चौक, चौंडेश्वरी मंदिर विटा बाजारपेठ, क्रांतिसिंह नाना पाटील पुतळा व याचा समारोप विटा हायस्कूल येथे झाला. या सायकल रॅलीत उपविभागीय अधिकारी संतोष भोर, तहसीलदार ऋषिकेत शेळके, मुख्याधिकारी मनोज देसाई, बळवंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, उपमुख्याधिकारी स्वप्निल खामकर, आरोग्य अधिकारी आनंद सावंत यांची उपस्थिती होती. भरपावसात निघालेल्या सायकल रॅलीमध्ये सर्व प्रशासकीय प्रमुख, अधिकारी, कर्मचारी, प्राध्यापक; तसेच बळवंत कॉलेजच्या ३०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. यातून विटा शहरातील नागरिकांनी ता. १३ ते १५ दरम्यान 'हर घर तिरंगा' मोहिमेत सहभागी होऊन आपल्या घरावर तिरंगा फडकवण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच तहसील कार्यालयामार्फत या मोहिमेच्या प्रचार प्रसिद्धीकरिता करण्यात आलेला चित्ररथ देखील शहरातील प्रमुख मार्गावरून फिरवण्यात आला.

Sangli, Main
09/08/2022 Page No. 2

# Sakal -01/05/2023

सकाळ



विटा : बळवंत महाविद्यालयाच्या समारंभात बोलताना संतोष डोके. व्यासपीठावर संतोष भोर, माधवराव मोहिते, डॉ. राजेंद्र मोरे.

## युवा पिढीने गुणवत्ता सिद्ध करावी : संतोष डोके

**विटा :** "स्पर्धात्मक युगात करिअरच्या विविध संधी निर्माण झाल्या आहेत. मात्र स्पर्धेमध्ये टिकण्यासाठी विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम करणे आवश्यक आहे. मन आणि मनगट सक्षम बनविणे, ध्येयनिश्चिती करून ते साध्य करेपर्यंत हार न मानणे त्याचबरोबर जिद्द, चिकाटी बाळगणे, कष्टाचे महत्त्व जाणणे, असे विविध गुण आजच्या तरुणाईच्या व्यक्तिमत्त्वात उतरले पाहिजेत, असे मत विटा ठाण्याचे निरीक्षक संतोष डोके यांनी व्यक्त केले. रयत शिक्षण संस्थेचे बळवंत कॉलेज येथे वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे दक्षिण विभागीय अध्यक्ष माधवराव मोहिते होते. प्रांताधिकारी संतोष भोर, गटविकास अधिकारी संदीप पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी प्रास्ताविक केले.प्रांताधिकारी संतोष भोर म्हणाले, "विद्यार्थ्यांनी स्पर्धा परीक्षेचे महत्त्व समजावून घेणे आवश्यक आहे. सकारात्मक विचार करण्याची पद्धती आणि त्याचे महत्त्व लक्षात घ्यावे. विविध क्षेत्रांत विशेष प्रावीण्य मिळविण्यासाठी झगडावे लागते, यश सहज मिळत नाही." संदीप पवार यांनी वाचनसंस्कृतीचे महत्त्व समजावून सांगितले. यावेळी माधवराव मोहिते, प्रा. व्ही. एस. मस्के प्रा. डॉ. व्ही. ए. बी. तपासे, प्रा. एस. एम. जाधव, डॉ. शहनाज सय्यद, डॉ. एस. एम. शेंडगे, प्रा. ए. आर. जमदाडे, डॉ. संध्या पोतदार, प्रा. कोमल धुमाळ, डी. टी. देवकाते, श्रेया पाटील, सिद्धेश्वर सपकाळ उपस्थित होते.

Sangli, Main
01/05/2023 Page No. 2

# Sakal -25/04/2023

सकाळ

# विद्यार्थिकेंद्रित उपक्रमांसाठी 'रयत' कटिबद्ध

## डॉ. अनिल पाटील : विटा येथे बळवंत कॉलेजमध्ये वसतिगृहाचे उद्‌घाटन

**विटा, ता. २४ :** "विद्यार्थ्यांना केंद्रबिंदू मानून, कर्मवीरांच्या विचारकार्याला प्रमाण मानून 'रयत'ने आजपर्यंत शैक्षणिक क्षेत्रात क्रांती घडवून आणली आहे. अनेक शाखांमध्ये वसतिगृहे बांधून विद्यार्थ्यांना आधुनिक शिक्षण देण्याची सोय 'रयत'च्या माध्यमातून केली जात आहे. नवीन शैक्षणिक धोरणानुसार विद्यार्थिकेंद्रित उपक्रम राबविण्यासाठी 'रयत' कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. अनिल पाटील यांनी व्यक्त केले.

रयत शिक्षण संस्थेचे बळवंत कॉलेज, विटा येथे आयोजित 'रुसा'अंतर्गत अनुदानातून बांधण्यात आलेल्या मुलांच्या वसतिगृहाचा उद्‌घाटन सोहळा झाला. त्या वेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य रामशेठ ठाकूर होते.

'रयत'चे सचिव डॉ. विठ्ठल शिवणकर, सहसचिव डॉ. शिवलिंग मेनकुदळे (उच्च शिक्षण), सहसचिव (माध्यमिक) राजेंद्र साळुंखे, रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्या श्रीमती सरोज पाटील, रयत शिक्षण संस्थेचे दक्षिण विभागीय अध्यक्ष माधवराव मोहिते, एम. बी. शेख, राजेंद्र साळुंखे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी प्रास्ताविक केले.

रामशेठ ठाकूर म्हणाले, "फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारकार्याचा वारसा कर्मवीर भाऊराव पाटील यांनी पुढे चालवत शिक्षणाची गंगा बहुजन समाजापर्यंत पोहोचविली. बहुजन समाजातील अनेक हुशार, कर्तृत्ववान विद्यार्थी हेरून त्यांना शिक्षण देऊन नवा महाराष्ट्र घडविण्याचे परिवर्तनवादी कार्य कर्मवीर अण्णांनी केले. हे कार्य अतुलनीय असे आहे. भविष्यकाळात ही ओळख आणखी समृद्ध करण्याचा संस्थेचा मानस आहे. स्वावलंबी शिक्षणाची विचारधारा प्रत्यक्षात राबवून गोरगरीब, बहुजन समाजातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचे परिवर्तनवादी कार्य 'रयत'ने केले आहे."



**विटा :** बळवंत महाविद्यालयातील मुलांच्या वसतिगृहाच्या उद्‌घाटनप्रसंगी मान्यवर.

Sangli, Sangli-Today
25/04/2023 Page No. 4

# Muktagiri 22/03/2023

दैनिक मुक्तागिरी

# विद्यार्थ्यांनी पुस्तक वाचन स्पर्धेकडे संधी म्हणून पाहावे : अनुराधा देशमुख

## बळवंत महाविद्यालयात 'अमृतवेल पुस्तक वाचन व आकलन स्पर्धे'चा शुभारंभ

**मुक्तागिरी वृत्तसेवा**

**विटा, दि. २१ :** शिक्षणाबरोबरच चौफेर वाचन आवश्यक आहे. कोणत्याही क्षेत्रात काम करताना वाचनाचा उपयोग होतो. पुस्तक वाचनातूनच व्यक्तिमत्त्वाचा विकास घडतो. म्हणूनच सातत्यपूर्ण वाचन आवश्यक असून अमृतवेल वाचन व आकलन स्पर्धेकडे संधी म्हणून पहावे, असे आवाहन ड्रीम सोशल फाऊंडेशनच्या अध्यक्षा अनुराधा प्रभाकर देशमुख यांनी केले.

येथील बळवंत महाविद्यालयात श्रीमती शहाबाई यादव साहित्य मंच आणि अमृतवेल ग्रामविकास प्रबोधिनी आयोजित 'अमृतवेल पुस्तक वाचन व आकलन स्पर्धे'अंतर्गत आयोजित कार्यक्रमात त्या बोलत होत्या.

देशमुख म्हणाल्या, विद्यार्थी दशेत भरपूर वाचन करावे. पुस्तके प्रेरणा देतात, मार्ग दाखवतात. वाचनातून मिळालेल्या माहितीचा आणि ज्ञानाचा आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर उपयोग होतो. प्रभाकर देशमुख यांनी कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी असताना शाळांच्या पेटीतील पुस्तके विद्यार्थ्यांच्या हातात येतील, यासाठी प्रयत्न केले. तसेच लोधवडे येथे ग्रंथालय आणि स्पर्धा परिक्षा अभ्यासिका उभारली आहे. सुधा मुर्ती यांनी म्हटल्याप्रमाणे माणसाची श्रीमंती त्याच्याकडे किती पुस्तके आहेत, यातून मोजली जाते.

यावेळीबोलतानातहसीलदार ऋषिकेत शेळके यांनी स्पर्धा परिक्षा, करियर आणि वाचनाचे महत्त्व विषद केले. अधिकाधिक वाचन करावे, त्याचा स्पर्धा परिक्षेबरोबरच आयुष्याच्या वाटचालीतही उपयोग होतो.

ज्येष्ठ पत्रकार बंडोपंत राजोपाध्ये, माजी नगराध्यक्ष ॲड. वैभव पाटील यांनी पुस्तक वाचनाचे महत्त्व विषद केले आणि अमृतवेल वाचन व आकलन या अभिनव स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन केले.

यावेळी ज्येष्ठ समाजसेवक संपतराव पवार, रयत शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य संग्रामसिंह देशमुख, रुपाली शेळके, उपप्राचार्य विष्णू मस्के, अमृतराव निंबाळकर, प्रा.दिनेश मस्के, पद्माकर यादव आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाचे स्वागत प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी केले. तर आभार दीपक पवार यांनी मानले. सूत्रसंचालन प्रा. प्रशांत पवार यांनी केले.



विटा : 'अमृतवेल पुस्तक वाचन व आकलन स्पर्धे'अंतर्गत आयोजित कार्यक्रमात बोलताना अनुराधा देशमुख व्यासपीठावर इतर मान्यवर

**शेळके दांपत्यांची अशीही गोपीनीयता**

- तहसीलदार ऋषिकेत शेळके यांनी खानापूर तालुक्यात साडेतीन वर्ष तहसीलदार म्हणून काम करताना कमालीची गोपनीयता पाळली. याचा किस्सा विट्याचे माजी नगराध्यक्ष ॲड. वैभव पाटील यांनी सांगितला. ते म्हणाले, साडेतीन तहसीलदार ऋषिकेत शेळके व त्यांच्या पत्नी यांनी गोपीनीयता पाळलली. आमचे पाहुणे आहेत. हे त्यांनी बदली झाल्यानंतर सांगितले. रोज घराच्या समोर ये - जा करीत मात्र घरी आले नाहीत. यावरुन त्यांच्या गोपीनियतेचा अंदाज तुम्हाला येईल. असे सांगताच उपस्थितांच्या मध्ये एकाच हशा पिकला.

**शेळके जिल्हाधिकारी होतील : अनुराधा देशमुख**

- देशमुख यांनी तहसीलदार ऋषिकेत शेळके यांच्या कामाचे कौतुक करताना म्हणाल्या, प्रभाकर देशमुख हे कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी होते. त्यांनी केलेल्या कामांची आठवण आजही लोक सांगतात. देशमुख हे पुढे विभागीय आयुक्त झाले. तुम्हीही पुढे जाऊन जिल्हाधिकारी बनाल. असे उच्चारताच शेळके दांपत्यांच्या चेहऱ्यावर समाधान भाव उमटले. अन् उपस्थितांच्या मध्ये टाळ्यांचा कडकडाट झाला.

# Sakal -10/04/2023

सकाळ

**सकाळ वृत्तसेवा**



पाडळी : येथे महिला सबलीकरण कार्यक्रमात बोलताना डॉ. श्रेया पाटील.

विटा, ता. ९ : महिलांना आर्थिक व्यवहार मोठ्या प्रमाणात करावे लागतात. सबलीकरणाची माहिती घेणे आवश्यक आहे. केंद्र व राज्याच्या योजनांचा लाभ घेऊन आर्थिक सक्षम होण्यासाठी महिला व युवतींनी सज्ज व्हावे, असे आवाहन बळवंत कॉलेजच्या आय. क्यू. ए. सी. समन्वयक डॉ. श्रेया पाटील यांनी केले.

बळवंत कॉलेजमधील कॉमर्स अँड मॅनेजमेंट, उद्योजकता विकास केंद्र व पाडळी (ता. तासगाव) ग्रामपंचायत यांच्यातर्फे आयोजित महिला सबलीकरण कार्यक्रमात त्या बोलत होत्या. ग्रामीण भागातील महिला सक्षमीकरणाचा उद्देश समोर ठेवून प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी उपक्रमाचे नियोजन केले होते.

डॉ. पाटील यांनी 'महिला ई- हाथ' या ऑनलाइन मार्केटिंग प्लॅटफॉर्म केंद्राच्या उपक्रमाची माहिती दिली. महिला बचतगटांनी एकत्र येऊन विविध वस्तूंची विक्री ऑनलाइन प्लॅटफॉर्मद्वारे करून आर्थिक सक्षम होण्यासाठीची प्रेरणा या माध्यमातून देण्यात आली.

प्रा. राणी चव्हाण, प्रा. रंजना बागल यांनी योजनांचा आढावा घेतला. प्राचार्य डॉ. मोरे यांनी या समाजाभिमुख उपक्रमाचे कौतुक केले. प्रा. दिव्या टिकोळे यांनी आभार मानले. उपक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. एस. एच. कोकरे, प्रा. स्नेहल कुंभार, प्रा. सुधा कांबळे, प्रा. हीना पानवले व विद्यार्थी स्वयंसेवकांनी प्रयत्न केले. सरपंच वंदना कुलकर्णी, उपसरपंच अजित पाटील उपस्थित होते.

Sangli, Sangli-Today
10/04/2023 Page No. 2

Sakal -15/04/2023

सकाळ



**विटा :** बळवंत कॉलेजमध्ये मान्यवरांचा सत्कार करताना डॉ. राजेंद्र मोरे.

# बळवंत कॉलेजमध्ये कार्यशाळा

**विटा, ता. १४ :** परिसरातील ४५ विद्यालयांतील गणित, विज्ञान व तंत्रज्ञान विषय शिक्षकांसाठी एकदिवसीय गणित, विज्ञान, तंत्रज्ञानविषयक कार्यशाळेचे आयोजन बळवंत कॉलेजमध्ये करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे होते.

कार्यशाळेमध्ये विज्ञान कृतियुक्त अध्यापन पद्धती या विषयावर न्यू इंग्लिश स्कूल, बेडग येथील हनुमंत म्हेत्रे यांनी व गणित कृतियुक्त अध्यापन पद्धती विषयावर महात्मा गांधी विद्यालय, रूकडी येथील गणेश माने आणि पोस्टर्स निर्मिती व छायाचित्र निर्मिती या विषयावर प्रा. नेताजी पाटील यांनी व प्रा. दिनेश धोंगडे यांनी मार्गदर्शन केले. विविध विषयांवर कृती व 'इ-लर्निंग'च्या माध्यमातून मार्गदर्शन करण्यात आले. विज्ञान आणि गणित विषय आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून विद्यार्थ्यांना सोप्या पद्धतीने स्वतःच्या कृतीतून नवनवीन संकल्पनांच्या माध्यमातून कसा शिकवता येईल, याची प्रात्यक्षिके देण्यात आली. गणितातील संकल्पना समजून घेण्यासाठी क्लृप्त्या महत्त्वाच्या असतात, याचे मार्गदर्शन करण्यात आले. कार्यशाळा दोन सत्रात झाली. कार्यशाळा यशस्वी करण्यासाठी सुशांत कदम, ओंकार कुंभार, ओंकार शिंदे, मृदुला रामटेके, रेश्मा कुंभार, करुणा जाधव, स्नेहा चव्हाण यांनी प्रयत्न केले. उपप्राचार्य विष्णू मस्के यांनी प्रास्ताविक केले. महेश बाबर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. अमोल ठुबे व प्रसाद खोत यांनी सूत्रसंचालन केले. अशोक खराडे यांनी आभार मानले.

Sangli, Main
15/04/2023 Page No. 5

Sakal -20/03/2023

सकाळ



विटा : बळवंत महाविद्यालयातील आरोग्य शिबिरात विद्यार्थ्यांची तपासणी करताना डॉक्टर.

# सदृढ बालक पुढे आदर्श नागरिक बनतात : डॉ. राजेंद्र मोरे

**विटा, ता. १९ :** आरोग्यपूर्ण जीवन जगणे, हे एक आव्हान बनत आहे. पर्यावरणाचे बिघडलेले संतुलन, निकृष्ट आहार आणि व्यायामाकडे दुर्लक्ष केल्यामुळे बालकांचे आरोग्य उत्तम राहत नसून त्याकडे जागरूक पालकांनी लक्ष देणे आवश्यक आहे, असे मत डॉ. राजेंद्र मोरे यांनी व्यक्त केले. बळवंत कॉलेज येथे जागरूक पालक-सदृढ बालक अभियानांतर्गत सार्वजनिक आरोग्य विभाग, सांगली व ग्रामीण रुग्णालय, विटा यांनी आयोजित केलेल्या विद्यार्थी आरोग्य तपासणी शिबिरात ते बोलत होते.

कनिष्ठ विभागाचे उपप्राचार्य विष्णू मस्के, पर्यवेक्षक एस. ए. सावंत, एस. एन. सावंत, एम. एच. बाबर उपस्थित होते. राज्यभरात १८ हून कमी वय असणाऱ्या बालकांच्या आरोग्य तपासणीचा उपक्रम सुरू आहे. पालकांनी आपली मुले हीच संपत्ती समजून त्यांच्या आरोग्याकडे लक्ष द्यावे, असे मत विटा ग्रामीण रुग्णालयातील डॉ. विजय शिंदे यांनी व्यक्त केले. कनिष्ठ विभागातील सर्व मुला-मुलींच्या आरोग्याची तपासणी करण्यात आली. जे विद्यार्थी आजारी किंवा विशिष्ट संसर्गाने बाधित असतील, त्यांच्यावर योग्य ते उपचार करण्यात आले. मुलींनाही डॉक्टरांनी विशेष मार्गदर्शन केले. डॉ. मोहम्मद मुल्ला, डॉ. रहिमान मुल्ला, युवराज माने, सौ. अर्चना माने यांनी सहभाग घेतला.

Sangli, Sangli-Today
20/03/2023 Page No. 2

Sakal -04/03/2023

सकाळ

# 'बळवंत'च्या ट्रेड फेअर डेचा मान्यवरांनी घेतला आस्वाद



विटा : बळवंत कॉलेजच्या ट्रेड फेअरमध्ये स्टॉलवर माहिती घेताना नितीन अग्रवाल, संतोष भोर, ऋषिकेत शेळके, संतोष डोके, डॉ. राजेंद्र मोरे आदी.

विटा, ता. ३ : येथील बळवंत कॉलेजमधील कॉमर्स अँड मॅनेजमेंट व उद्योजकता विकास केंद्र आयोजित ट्रेड फेअर डे मध्ये मान्यवरांनी सहभाग घेत खाद्यपदार्थांचा आस्वाद घेतला. उद्घाटन युरो फ्रूट्स प्रायव्हेट लिमिटेड, कार्वे नितीन अग्रवाल यांच्या हस्ते झाले. उपविभागीय अधिकारी संतोष भोर, तहसीलदार ऋषिकेत शेळके, पोलिस निरीक्षक संतोष डोके आदी मान्यवर उपस्थित होते.

स्वागत प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी केले. या ट्रेड फेयरसाठी विद्यार्थ्यांनी विविध वस्तू विक्रीचे स्टॉल मांडले होते. पाणीपुरी, भेळ, चायनीज, कोकणी वडा, दाबेली, कलिंगडे, बिर्याणी, मठ्ठा, लस्सी, आईस्क्रीम, ताक, उसाचा रस, सरबत या पदार्थांची मोठ्या प्रमाणात विक्री झाली. दिवसभरात १४३० लोकांनी येथे भेटी दिल्या. आजच्या पिढीने उत्पादन विक्रीसाठी आवश्यक असलेले ज्ञान, नवीन कौशल्य, या माध्यमातून विद्यार्थ्यांना अवगत झाले. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे व इतर मान्यवरांनी विद्यार्थ्यांच्या विक्री कौशल्य, संघटन कौशल्य या गुणांचे कौतुक केले. स्टॉलची रचना, स्पॉन्सरशिप, विक्री व्यवस्थापन, कौशल्य याआधारे उत्कृष्ट तीन पारितोषिके विद्यार्थ्यांना देण्यात आली. नियोजन कॉमर्स विभागप्रमुख डॉ. श्रेया पाटील व प्रा. राणी चव्हाण यांनी केले. उपक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. एस. एच. कोकरे, प्रा. दिव्या टीकोळे, प्रा. रंजना बागल, प्रा. स्नेहल कुंभार, प्रा. सुधा कांबळे, प्रा. हिना पानवले व विद्यार्थी स्वयंसेवक यांनी प्रयत्न केले.

Sangli, Main
04/03/2023 Page No. 2

Sakal -03/03/2023

सकाळ

# मराठी भाषा संवर्धनात एस.टी.चे योगदान

## प्रा. वनिता होवाळे : विटा आगारात मराठी भाषा गौरव दिन

▸सकाळ वृत्तसेवा

विटा, ता. २ : मराठी भाषेला प्राचीन परंपरा आहे. ज्ञानदेव-तुकारामांपासून चालत आलेली मराठी ही महाराष्ट्राची अस्मिता आहे. विविध प्रादेशिक बोलींनी भाषा समृद्ध बनली आहे. दैनंदिन भाषाव्यवहार मराठीतच केला पाहिजे. १९४८ मध्ये स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने 'प्रवाशांच्या सेवेसाठी' ब्रीद स्वीकारले. एसटीचे कामकाज मराठीतूनच चालत आहे.

एस. टी. चे फलक क्रमांक इतकेच नव्हे, तर तिकीटसुद्धा मराठीतच असते, असे प्रतिपादन बळवंत कॉलेज येथील प्रा. वनिता होवाळे यांनी केले. विटा आगारातर्फे मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात बोलत होत्या.



विटा : एसटी आगारात मराठी भाषा गौरव दिनी उपस्थित प्रा. वनिता होवाळे, विनायक माळी, जाधव, गुरव.

विटा आगारात मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त बनवलेल्या फलकाचे, तसेच रांगोळीचे उद्घाटन प्रा. होवाळे यांच्या हस्ते करण्यात आले. मराठी भाषा संवर्धनासाठी एस. टी. कर्मचारी, प्रवासी, विद्यार्थ्यांनी सामूहिक प्रतिज्ञेचे वाचन केले. सहायक वाहतूक निरीक्षक विनायक माळी यांनी प्रास्ताविक केले. कार्यशाळा अधीक्षक जाधव, स्थानक प्रमुख रोहित गुरव, वाहतूक निरीक्षक शैलेश मोहिते यांच्यासह आगारातील कर्मचारी, प्रवासी उपस्थित होते.

Sangli, Sangli-Today
03/03/2023 Page No. 4

Punya nagri -01/03/2023

पुण्य नगरी

# मराठी भाषा महाराष्ट्राची अस्मिता

वनिता होवाळे

**खानापूर / वार्ताहर :** विविध प्रादेशिक बोलींनी समृद्ध असणाऱ्या मराठी भाषेला प्राचीन परंपरा लाभली आहे. ज्ञानदेव-तुकारामांपासून चालत आलेली मराठी भाषा म्हणजे मराठी महाराष्ट्राची अस्मिता आहे. आपल्या माय मराठीचे संवर्धन करण्यासाठी मराठी भाषा प्रत्येक मराठी माणसाने आपल्या मनापासून जपली पाहिजे, असे प्रतिपादन बळवंत कॉलेज, विटा येथील प्रा. वनिता होवाळे यांनी केले.



**खानापूर : प्रा. वनिता होवाळे यांच्या सत्कारप्रसंगी वाहतूक निरीक्षक विनायक माळी, स्थानकप्रमुख रोहित गुरव, वाहतूक निरीक्षक शैलेश मोहिते व कर्मचारी, प्रवासी.**

त्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ विटा आगाराच्यावतीने आयोजित मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त आयोजित व्याख्यानात बोलत होत्या. यावेळी विटा आगारात मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त बनवण्यात आलेल्या फलकाचे व रांगोळीचे उद्घाटन प्रा. वनिता होवाळे यांच्याहस्ते केले. मराठी भाषा संवर्धनासाठी एस. टी. कर्मचारी, प्रवासी, विद्यार्थी यांनी सामूहिक प्रतिज्ञेचे वाचन केले. प्रास्ताविक सहाय्यक वाहतूक निरीक्षक विनायक माळी यांनी केले. कार्यशाळा अधीक्षक जाधव, स्थानक प्रमुख रोहित गुरव, वाहतूक निरीक्षक शैलेश मोहिते, कर्मचारी, प्रवासी, विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Smart Sangli Edition
Mar 1, 2023 Page No. 3
Powered by : eReleGo.com

# Sakal -27/02/2023

सकाळ

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; विटा येथे 'सुयेक'चे राज्यस्तरीय अधिवेशन

# अर्थशास्त्रातील नवसंकल्पनांचा शोध घ्यावा

**विटा, ता. २६ :** विद्यार्थ्यांच्या, नवसंशोधकांच्या क्षमता विकसित करणे, त्यांना विविध संधी उपलब्ध करून देणे हे आजच्या शिक्षणाचे आद्य कर्तव्य आहे. जागतिक पातळीवर अर्थशास्त्र, संख्याशास्त्र आणि फार्मसी या विषयांना अधिक महत्त्व आहे. त्यासाठी अर्थशास्त्रातील नवसंकल्पनांचा परिचय विद्यार्थ्यांना, नवसंशोधकांना करून देणे महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. डी. टी. शिर्के यांनी व्यक्त केले.



**विटा : येथे राज्यस्तरीय वार्षिक अधिवेशनात बोलताना डॉ. डी. टी. शिर्के. व्यासपीठावर मान्यवर.**

बळवंत महाविद्यालयात शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशन (सुयेक)च्या ३२ व्या राज्यस्तरीय वार्षिक अधिवेशन तसेच कुक्कुटपालनाचे अर्थशास्त्र आणि आभासी चलन: भ्रम, आभास आणि वास्तव या विषयावरील चर्चासत्राच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते.

या वेळी अखिल भारतीय मराठी अर्थशास्त्र परिषदेचे अध्यक्ष डॉ. आर. बी. भांडवलकर, ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. पी. बी. कुलकर्णी, शिवाजी विद्यापीठातील अर्थशास्त्र विभागप्रमुख प्रा. व्ही. पी. कट्टी यांची उपस्थिती होती. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी केले. डॉ. आर. बी. भांडवलकर यांनी अखिल भारतीय मराठी अर्थशास्त्र परिषदेच्या कार्यप्रणालीविषयी मनोगत व्यक्त केले. सुयेकच्या ३३ व्या अधिवेशनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. राहुल म्होपरे यांनी आपल्या दिवंगत ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ प्रा. डॉ. जे. एफ. पाटील यांच्या विचार कार्यावर प्रकाश टाकला. कुक्कुटपालनाचे अर्थशास्त्र आणि आभासी चलन: भ्रम आभास आणि वास्तव या विषयावरील चर्चासत्रासाठी १५० शोधनिबंध लिहिण्यात आले. या वेळी शिवार्थ या वार्षिक अंकाचे प्रकाशन प्रमुख मान्यवरांचे हस्ते झाले. प्रा. राजकुमार पवार यांच्या फोटो प्रदर्शनाचे उद्घाटन कुलगुरूंच्या हस्ते झाले.

या वेळी डॉ. संजय धोंडे, डॉ. एम. जे. पाटील, डॉ. पी. एस. कांबळे, डॉ. एस.एम. भोसले, डॉ. ए. के. वाळवे, डॉ. डी. के. पाटील, डॉ. जे. एस. पाटील, डॉ. आर.जी. दांडगे उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. संध्या पोतदार व प्रा. प्रियांका शिंदे यांनी केले. अर्थशास्त्र विभागप्रमुख डॉ. प्रवीण बाबर यांनी आभार मानले.

Sangli Main
27/02/2023 Page No.102

janpravas-04/02/2022

# यश सिद्धीसाठी आत्मविश्वास जोपासावा : पोलीस निरीक्षक संतोष डोके

## बळवंत कॉलेजमध्ये वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा

**जनप्रवास । प्रतिनिधी**

**विटा :** आजच्या स्पर्धात्मक युगात करियरच्या अनेकविध संधी निर्माण झाल्या आहेत. पण या स्पर्धेमध्ये टिकण्यासाठी विद्यार्थ्यांनी अथक परिश्रम करणे गरजेचे आहे. मन आणि मनगट बदलत्या काळात सक्षम बनविणे, ध्येयनिश्चिती करून ते साध्य करेपर्यंत हार न मानणे त्याचबरोबर जिद्द, चिकाटी बाळगणे, कष्टाचे मोल जाणणे असे अनेक मौलिक गुण आजच्या तरुणाईच्या व्यक्तिमत्त्वात उतरले पाहिजेत. आजच्या काळात क्रीडा हे करिअरचेसुद्धा एक महत्त्वाचे क्षेत्र बनत आहे. क्रीडा क्षेत्रात अतुलनीय कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना शासकीय नोकऱ्यात विशेष कोट्याची तरतूद केली गेली आहे. जीवनात यश सिद्धीसाठी, उत्तुंग भरारी घेण्यासाठी आजच्या युवा पिढीने आत्मविश्वास जोपासावा, असे प्रतिपादन विटा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष डोके यांनी व्यक्त केले.



**बळवंत कॉलेजमध्ये आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करताना विटा पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष डोके.**

येथील बळवंत कॉलेजमध्ये आयोजित वार्षिक पारितोषिक वितरण समारंभात प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेचे दक्षिण विभागीय अध्यक्ष माधवराव मोहिते होते तर यावेळी प्रांताधिकारी संतोष भोर, गटविकास अधिकारी संदीप पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. स्वागत व प्रास्ताविक महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.राजेंद्र मोरे यांनी केले. प्रांताधिकारी संतोष भोर यांनी आपल्या मनोगतात विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेचे महत्व पटवून दिले. सकारात्मक विचार करण्याची पद्धती आणि त्याचे महत्त्व सांगून त्यांनी विविध क्षेत्रात विशेष प्राविण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करीत त्यांना भावी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. गटविकास अधिकारी संदीप पवार यांनी आपल्या मनोगतात वाचन संस्कृतीचे महत्त्व सांगितले. मोबाईलच्या अतिरिक्त आहारी गेलेल्या तरुणाईने वाचनाकडे वळावे. मोबाईलचा वापर वाईट कामांसाठी करण्यापेक्षा चांगल्या कामासाठी केला पाहिजे. माधवराव मोहिते म्हणाले की, रयत शिक्षण संस्था ही बहुजनांची संस्था आहे, संस्थेने शिक्षण क्षेत्रात क्रांती केली आहे. विद्यार्थी केंद्रित उपक्रम राबविण्यासाठी 'रयत' नेहमीच अग्रेसर असते. भविष्यकाळात विद्यार्थ्यांना ग्लोबल बनविण्यासाठी 'रयत' प्रयत्नशील असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले.

यावेळी ज्युनिअर विभागातील वार्षिक अहवालाचे वाचन कार्याध्यक्ष प्रा. व्ही. एस. मस्के यांनी केले. सिनिअर विभागातील वार्षिक अहवालाचे वाचन कार्याध्यक्ष प्रा.डॉ.व्ही.ए.बी.तपासे यांनी केले. क्रिडा विभागातील पारितोषिकाचे वाचन प्रा.एस.एम.जाधव यांनी, शैक्षणिक विभागातील डॉ.शहनाज सय्यद, तसेच एन.एन.सी.विभागातील पारितोषिकाचे वाचन डॉ. एस. एम. शेंडगे यांनी केले. यावेळी उल्लेखनीय कामगिरी केलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केलेल्या प्राध्यापकांचाही सत्कार यावेळी प्रमुख मान्यवरांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी उपप्राचार्य प्रा. डी. टी. देवकाते, आय. क्यू. ए. सी.प्रमुख डॉ.श्रेया पाटील, डॉ.सिद्धेश्वर सपकाळ, प्राध्यापक, विद्यार्थी, प्रशासकीय सेवक उपस्थित होते. सूत्रसंचालन डॉ. संध्या पोतदार, व प्रा. कोमल धुमाळ यांनी केले. आभार प्रा. ए. आर.जमदाडे यांनी मानले.

Janpravas-30/06/2023

# रयत सेवक हे त्याग अन् सेवेचे प्रतीक

## प्राचार्य सी.जे.खिलारे : थोरावडे यांनी संस्थेशी एकनिष्ठ राहून आपल्या कामातून मौलिक योगदान दिले

प्रतिनिधी
विटा

रयत सेवक या शब्दांमध्ये त्याग, निस्वार्थीपणा आणि सेवा हा अर्थ लपलेला आहे. कार्यतत्परता, हसतमुख चेहरा, सहकार्याची भावना आणि वक्तशीरपणा या गुणांनी संपन्न असणाऱ्या थोरावडे यांचा 'बळवंत'च्या प्रगतीत मोलाचा वाटा आहे. थोरावडे यांच्यासारखे रयत सेवक हे रयत शिक्षण संस्थेचे बलस्थान आहेत, असे मत प्राचार्य सी. जे. खिलारे यांनी व्यक्त केले.

येथील बळवंत बळवंत महाविद्यालयात कार्यालय प्रमुख प्रमोद थोरावडे यांचा सेवापुर्ती सत्कार समारंभ उत्साहात पार पडला. प्रमुख पाहुणे म्हणून पंढरपूर येथील कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे, दहिवडी कॉलेजचे प्राचार्य डॉ. एस. टी. साळुंखे उपस्थित होते. कोल्हापूरचे राजर्षी छत्रपती शाहू कॉलेजचे प्राचार्य डॉ. एल. डी. कदम, बळवंत कॉलेजचे माजी प्राचार्य डॉ. शंकरराव कदम, माजी प्रभारी प्राचार्या डॉ. उज्ज्वला शहा, विद्यमान प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, प्रा. बी. बी. लगारे, ॲड सुभाष पाटील यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



विटा : प्रमोद थोरावडे यांचा सेवानिवृत्ती सत्कार करताना डॉ. सी. जे. खिलारे यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, डॉ. एस. टी. साळुंखे आदी

प्राचार्य डॉ. सी. जे. खिलारे म्हणाले, कार्यालय प्रमुख पदावरून थोरावडे आपल्या ३२ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेतून निवृत्त होत आहेत. थोरावडे हे रयत संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचार कार्यांनी भारलेले रयत सेवक आहेत. महाविद्यालयाच्या प्रशासकीय कामात तज्ज्ञ असणारे, प्रेमळ, शांत आणि शिस्तप्रिय स्वभाव असणारे थोरावडे यांचा लोकसंपर्क मोठा आहे. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे म्हणाले, कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याकडून प्रेरणा घेऊन थोरावडे यांनी संस्थेशी एकनिष्ठ राहून, जबाबदारीने कामाचा ध्यास घेऊन आपल्या कामातून मौलिक असे योगदान दिलेले आहे. पुढच्या वाटचालीत त्यांना सुख, समाधान, आरोग्यपूर्ण जीवन लाभावे.

यावेळी आदर्श कॉलेजचे प्राचार्य डॉ. भाऊसाहेब कोरे, आटपाडीच्या श्रीमंत बाबासाहेब देशमुख कॉलेजचे प्राचार्य डॉ. शिवाजीराव भोसले, प्रा. बाबुराव लगारे, ॲड. सुभाष पाटील, अशोक कदम विलास पाटील, सुरेश पाटील, जयराम मोरे, विलास शिंदे, ॲड. शौर्या पवार यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

## Janpravas -28/02/2023

# ‘मराठी भाषा संवर्धनात एसटी महामंडळाचे योगदान मौलिक’

प्रतिनिधी
विटा

विविध प्रादेशिक बोलींनी समृद्ध असणाऱ्या मराठी भाषेला प्राचीन परंपरा लाभली आहे. ज्ञानदेव–तुकारामांपासून चालत आलेली मराठी भाषा म्हणजे मराठी महाराष्ट्राची अस्मिता आहे. आपल्या माय मराठीचे संवर्धन करण्यासाठी मराठी भाषा प्रत्येक मराठी माणसाने मनापासून जपली पाहिजे. मराठी भाषा संवर्धनात एसटी महामंडळाचे योगदान मौलिक आहे, असे प्रतिपादन प्रा. वनिता होवाळे यांनी केले.



**विटा : मराठी राजभाषा गौरव दिनी फलक अनावरणप्रसंगी प्रा. वनिता होवाळे, विनायक माळी, रोहित गुरव आदी.**

येथील बळवंत महाविद्यालयात महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ विटा आगाराच्यावतीने मराठी राजभाषा गौरव दिनाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी आयोजित व्याख्यानात प्रा. होवाळे बोलत होत्या. यावेळी विटा आगारात मराठी राजभाषा गौरव दिनानिमित्त बनवण्यात आलेल्या फलकाचे आणि रांगोळीचे उद्घाटन प्रा. होवाळे यांच्याहस्ते करण्यात आले. प्रा. होवाळे म्हणाल्या, आपला दैनंदिन भाषा व्यवहार करताना मराठी भाषेतच केला पाहिजे. १९४८ साली स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने प्रवाशांच्या सेवेसाठी हे ब्रीदवाक्य स्विकारले आहे. एसटीचे कामकाज मराठी भाषेतूनच चालते. एसटीचे फलक एसटीचे नंबर इतकेच नव्हे तर एसटीचे तिकीट सुद्धा मराठी भाषेतच असते, असेही प्रा. होवाळे म्हणाल्या.

यावेळी मराठी भाषा संवर्धनासाठी एसटी कर्मचारी, प्रवासी, विद्यार्थी यांनी सामूहिक प्रतिज्ञेचे वाचन केले.

## *Janpravas*-28/03/2023

# व्यक्तिमत्त्वाचा विकास वाचनातून : अनुराधा देशमुख

## अमृतवेलची 'पुस्तक वाचन-आकलन कार्यशाळा'



विटा : स्पर्धेच्या शुभारंभप्रसंगी बोलताना अनुराधा देशमुख, तहसिलदार ऋषिकेत शेळके, प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, धर्मेंद्र पवार, अमृतराव नाईक-निंबाळकर आदी.

प्रतिनिधी
विटा

शिक्षणाबरोबरच चौफेर वाचन आवश्यक आहे. कोणत्याही क्षेत्रात काम करताना वाचनाचा उपयोग होतो. वाचनातूनच व्यक्तिमत्त्वाचा विकास घडतो. म्हणूनच सातत्यपूर्ण वाचन आवश्यक आहे. 'अमृतवेल वाचन-आकलन' स्पर्धेकडे संधी म्हणून पहावे, असे आवाहन ड्रीम सोशल फौंडेशनच्या अध्यक्षा अनुराधा प्रभाकर देशमुख यांनी केले.

श्रीमती शहाबाई यादव साहित्य मंच आणि अमृतवेल ग्रामविकास प्रबोधिनी आयोजित 'अमृतवेल पुस्तक वाचन-आकलन स्पर्धे'अंतर्गत बळवंत महाविद्यालयात आयोजित कार्यशाळेत अनुराधा देशमुख बोलत होत्या. तहसिलदार ऋषिकेत शेळके, प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, अमृतवेल समूहाचे संस्थापक धर्मेंद्र पवार, देवदत्त राजोपाध्ये यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.

देशमुख म्हणाल्या, विद्यार्थी दशेत वाचन करावे. पुस्तके प्रेरणा देतात, मार्ग दाखवतात. वाचनातून मिळालेल्या माहितीचा आणि ज्ञानाचा आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर उपयोग होतो. माजी आयुक्त प्रभाकर देशमुख यांनी कोल्हापूर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी असताना शाळांच्या पेटीतील पुस्तके विद्यार्थ्यांच्या हातात येतील, यासाठी प्रयत्न केले. लोधवडे येथे ग्रंथालय आणि स्पर्धा परीक्षा अभ्यासिका उभारली आहे. सुधा मूर्ती यांनी म्हटल्याप्रमाणे माणसाची श्रीमंती त्याच्याकडे किती पुस्तके आहेत, यातून मोजली जाते.

तहसीलदार ऋषिकेत शेळके यांनी अधिकाधिक वाचन करावे, त्याचा स्पर्धा परीक्षेबरोबरच आयुष्याच्या वाटचालीतही उपयोग होतो, असे मत व्यक्त केले. देवदत्त राजोपाध्ये, माजी नगराध्यक्ष वैभव पाटील यांनी पुस्तक वाचनाचे महत्त्व स्पष्ट केले आणि अमृतवेल वाचन-आकलन या अभिनव स्पर्धेत सहभागी होण्याचे आवाहन केले.

यावेळी संपतराव पवार, रयत शिक्षण संस्थेचे कार्यकारिणी सदस्य संग्रामसिंह देशमुख, अमृतराव निंबाळकर, पद्माकर यादव यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. कार्यकाळ पूर्ण करून गडहिंग्लज येथे बदली झालेले विट्याचे तहसिलदार ऋषिकेत शेळके यांचा धर्मेंद्र पवार यांच्याहस्ते सत्कार झाला. स्वागत प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी केले सूत्रसंचालन प्रशांत पवार यांनी केले. आभार दिपक पवार यांनी मानले.

Janpravas- 22/02/2023

# छत्रपती शिवाजी महाराजांनी सक्षम स्वराज्य उभे केले

## डॉ. सपकाळ : बळवंत महाविद्यालयात व्याख्यान

**प्रतिनिधी**
विटा

छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड समुदायातील मावळे संघटीत करून स्वराज्याचे स्वप्न सत्यात उतरविले. परधर्म सहिष्णुता हे धोरण स्वीकारून स्वराज्याच्या आड येणाऱ्या प्रत्येक दुष्ट प्रवृतींचा नायनाट केला. छत्रपती शिवाजी महाराज म्हणजे बहुजनांचे सक्षम स्वराज्य उभे करणारा जाणता राजा होय, असे प्रतिपादन कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, मायणी येथील इतिहास विभाग प्रमुख डॉ. सिद्धेश्वर सपकाळ यांनी व्यक्त केले.

येथील बळवंत महाविद्यालयात इतिहास विभाग आणि कला, वाणिज्य आणि विज्ञान महाविद्यालय, मायणी यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या जयंतीनिमित्त व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी डॉ. सपकाळ बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे होते.

प्राचार्य डॉ. मोरे म्हणाले, शिवाजी महाराज यांच्या अलौकीक विचार कार्यामुळेच महाराष्ट्र आज एका उंचीवर उभा आहे. अनंत संघर्ष, अंतर्गत विरोधाला धैर्याने तोंड देत छत्रपतींनी



**विटा : व्याख्यानात बोलताना डॉ. सिद्धेश्वर सपकाळ.**

मौलिक असे स्वराज्य निर्माण केले. जिजामातांच्या तात्विक विचारांचे अधिष्ठान आणि छत्रपती शहाजी राजांच्या स्वराज्य निर्मितीची संकल्पना आत्मसात करून छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरापगड समुदायातील मावळे संघटीत करून स्वराज्याचे स्वप्न सत्यात उतरविले. तरूण पिढीने छत्रपतींचे विचार कार्य वाचून शिवजयंती साजरी करण्याचा संकल्प करणे गरजेचे आहे, असेही प्राचार्य डॉ. मोरे म्हणाले. सूत्रसंचालन प्रा. प्रदीप निकम यांनी तर आभार फिरोज जमादार यांनी मानले.

Janpravas-28/01/2023

# मराठी भाषा म्हणजे महाराष्ट्राची अस्मिता : प्रा.डॉ.सुनील बुद्धनवार

**प्रगल्भनायक न्यूज नेटवर्क**
**विटा**

सौ.विजयमाला पतंगराव कदम प्राथमिक, माध्यमिक व ज्युनिअर कॉलेज विटा व बळवंत कॉलेज, विटा (मराठी विभाग) यांच्या संयुक्त विद्यमाने 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा' (१४ जानेवारी ते २८ जानेवारी ) निमित्त 'लाभले आम्हास, भाग्य बोलतो मराठी' या उपक्रमांतर्गत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रा. डॉ. सुनील बुद्धनवार बोलत होते. " मराठी भाषा ही महाराष्ट्राची अस्मिता आहे. मराठी भाषेच्या संवर्धनासाठी आपण मराठी भाषा बोलली पाहिजे, तिचा व्यवहारांमध्ये उपयोग केला पाहिजे. मराठी भाषेमध्ये अनेक संतांनी, शाहिरांनी, कवींनी विपुल लेखन केलेले आहे. आपण ज्या परिसरामध्ये राहतो, त्या परिसरातील मराठी भाषेच्या शब्दांचा संग्रह केला पाहिजे, ते शब्द आपल्या दैनंदिन बोलण्यात बोलले पाहिजे. श्रवण, भाषण, संभाषण व लेखन ही कौशल्य विद्यार्थ्यांनी आत्मसात केली पाहिजेत. भाषेमुळे आपले व्यक्तिमत्व सुधारते.



मराठी भाषा ही आपली मातृभाषा आहे, ती जन्मताच आपल्याला बोलता येते, म्हणून ती सर्वांना प्रिय आहे. मराठी भाषा ही नाना बोलींनी सजलेली आहे. मराठी भाषा ही परदेशीही ऐकू येते. यावेळी प्रा. डॉ. दिनेश वाघुंबरे व सुप्रसिद्ध साहित्यिक रघुराज मेटकरी सर प्रा. सौ. वनिता होवाळे यांनीही आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशालेच्या प्राचार्या वैशाली कोळेकर यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राजू गारोळे यांनी केले. इयत्ता सहावीच्या वर्गातील विद्यार्थिनी सुमधुर आवाजात स्वागतगीत गाऊन पाहुण्यांचे मनस्वी स्वागत केले. आभार स्वप्नाली भिंगारदेवे यांनी मानले.

Sakal-29/04/2023

सकाळ

# आविष्कार स्पर्धेत 'बळवंत'चे यश

विटा, ता. २९ : शिवाजी विद्यापीठ (कोल्हापूर) येथे झालेल्या विद्यापीठस्तरीय आविष्कार संशोधन स्पर्धेत बळवंत कॉलेज (विटा) येथील प्रा. नेताजी माधवराव पाटील यांना कृषी व पशुसंवर्धन या गटामधून दुसरा व प्रा. बजरंग बाळासो पाटील यांना 'मूलभूत विज्ञान' या गटातून दुसरा क्रमांक मिळाला. शिवाजी विद्यापीठाच्या कुलसचिवांच्या हस्ते पारितोषिक वितरण झाले. प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी त्यांचा सत्कार केला.

Janpravas -09/03/2023

# शरद पवार नवसंकल्पनांची दृष्टी लाभलेले मुत्सद्दी सुधारक

## डॉ. सुधीर भोंगाळे यांचे प्रतिपादन : बळवंत महाविद्यालयात राज्यस्तरीय चर्चासत्र

प्रतिनिधी
विटा

आधुनिक महाराष्ट्राच्या प्रगतीत सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, कृषी क्षेत्रात कार्य करणाऱ्या सुधारकांचे विचार कार्य नेहमीच आदर्शवत राहिले आहे. शरद पवार मराठी मातीतले एक अनमोल रत्न आहेत. उत्तम श्रोते, शिस्तबद्धता, चौफेर वाचन, समयसूचकता, प्रभावी निर्णयक्षमता, दूरदृष्टी अशा विविध गुणवैशिष्ट्यांनी परिपूर्ण असणारे पवार यांचे व्यक्तिमत्त्व आजच्या तरूणांचे आदर्श बनावे, असे प्रतिपादन सामाजिक कार्यकर्ते डॉ. सुधीर भोंगळे यांनी केले.

बळवंत महाविद्यालयात राज्यशास्त्र आणि इतिहास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने 'रयत शिक्षण संस्थेची वाटचाल आणि शरद पवार साहेब" या विषयावरील राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन केले होते. यावेळी भोंगळे बोलत होते. अध्यक्षस्थानी रयत शिक्षण संस्थेच्या जनरल बॉडी सदस्य सरोज माई पाटील होत्या. संस्थेचे दक्षिण विभागीय अध्यक्ष माधवराव मोहिते, मॅनेजिंग कौन्सिल सदस्य एम. बी. शेख, प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते.



विटा : चर्चासत्रात बोलताना डॉ. सुधीर भोंगाळे, यावेळी माधवराव मोहिते, सरोज माई पाटील, एम. बी. शेख, प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे आदी.

भोंगळे म्हणाले, रयत शिक्षण संस्थेसारख्या आदर्श शिक्षण संस्थेत शरद पवार गेली ४८ वर्षे कार्यरत आहेत. ३३ वर्षे ते रयत शिक्षण संस्थेचे अध्यक्ष म्हणून काम पाहत आहेत. रयतच्या जडणघडणीत पवार यांचे योगदान अनमोल आहे. शिक्षण क्षेत्रातील बदलत्या ध्येय धोरणांकडे ते दूरदृष्टीने पाहतात. विविध नवउपक्रम ते सतत राबवित असतात. नवसंकल्पनांची दृष्टी लाभलेले ते मुत्सद्दी सुधारक आहेत.

सरोज माई पाटील यांनी शरद पवार यांच्या बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला. पुरोगामी विचारांच्या कुटुंबातील खोड्या काढणारा शरद पवार ते देश विकासासाठी लाखो लोकांचे संघटन बांधणारा आणि सामान्य माणसाच्या हितासाठी अग्रेसर असणारा शरद पवार हा एका वादळाचा प्रवास आहे, असे म्हणाल्या. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी केले. परिचय डॉ. मल्लिकार्जुन बंदारे यांनी करून दिला. सूत्रसंचालन डॉ. संध्या पोतदार यांनी केले.

Janpravas– 12/04/2023

# सकारात्मक समाजासाठी आत्मचिंतन गरजेचे

प्रतिनिधी
विटा

भौतिक समृद्धीच्या अट्टहासापोटी माणूस नातेसंबंधापासून दुरावत चालला आहे. माणसाला संवादहिनतेच्या भयंकर रोगाने ग्रासले आहे. एकूणच विनाशाकडे वाटचाल करीत असलेल्या समाजाला योग्य दिशादर्शन करणे महत्त्वाचे आहे. सकारात्मक समाज जीवनाच्या निर्मितीसाठी आत्मचिंतन करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे मराठी अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले.

येथील बळवंत महाविद्यालय आणि शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर पुरस्कृत स्वातंत्र्यवीर दादा उंडाळकर व्याख्यानमाले अंतर्गत 'समाज जीवनाचे भान विसरतोय काय?' या विषयावरील व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मराठी अधिविभाग प्रमुख प्रा. डॉ. मोरे बोलत होते. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे होते.

डॉ. नंदकुमार मोरे म्हणाले, आजचा एकूणच समाज एका आभासी जगात वावरतो आहे. एकीकडे आधुनिकीकरण, जागतिकीकरण, मॉल संस्कृती आणि झगमगता वर्ग तर दुसरीकडे रास्त भाव धान्य दुकानांसमोर लागलेल्या गोरगरीब जनतेच्या रांगा, उपासमार, गरिबी, कुपोषण, रोगराईने ग्रासलेला समाज असे चित्र दिसते. अशा विसंगतीच्या गर्तेत अडकलेल्या समाजाच्या सर्वकष प्रगतीसाठी सामुहिक प्रयत्न गरजेचे आहेत.

आधुनिक विज्ञान तंत्रज्ञानातील सर्वकष क्रांतीचे उपयोजन मानवी सुखासाठी असणे अभिप्रेत होते. पण प्रत्यक्षात तसे घडताना कोठेही दिसत नाही. पाश्चात्य संस्कृतीचे अंधानुकरण, प्रचंड स्पर्धा, मोबाईल संस्कृती, राजकारणातील विसंगती, आधुनिकीकरण-जागतिकीकरणाचा अतिरेकीपणा या सर्वामुळे मानवी जीवनात प्रचंड अशी उदासीनता पसरली आहे, असेही प्रा. डॉ. मोरे म्हणाले.



विटा : व्याख्यानमालेत बोलताना प्रा. डॉ. नंदकुमार मोरे यावेळी प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांच्यासह मान्यवर

प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे म्हणाले, आधुनिक काळात समाज कृत्रिम जीवन जगत आहे. नैसर्गिक जगणे हरवून गेलेला माणूस स्वार्थी-आत्मकेंद्री झाला आहे. ही व्यवस्था बदलण्याची जबाबदारी आजच्या महाविद्यालयीन तरूण पिढीवर आहे, असेही प्राचार्य डॉ. मोरे म्हणाले.

यावेळी कला विभागातील विद्यार्थ्यांनी रेखाटलेल्या चित्रांचे प्रदर्शन भरविण्यात आले होते. त्याचे उद्घाटन डॉ. नंदकुमार मोरे, प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांच्याहस्ते करण्यात आले. प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. दिनेश वाघुंबरे यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. राणी चव्हाण आणि डॉ. संध्या पोतदार यांनी केले.

PAP/VSJ

# Janpravas-04/12/2022

# क्रांतीकारकांच्या विचारांची समाजाला गरज

## प्रा. राजा माळगी : बळवंत महाविद्यालयात एकदिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्र उत्साहात

प्रतिनिधी

विटा

भारतीय स्वातंत्र्य चळवळीचा इतिहास हा क्रांतीकारी विचारांनी भारलेला आहे. भारतीय स्वातंत्र्याची बिजे संपूर्ण देशातील छोट्या छोट्या चळवळीत लपली होती. सातारा परिसरात स्वातंत्र्य चळवळीला गतिमान करण्याचे कार्य क्रांतीअग्रणी जी. डी.बापू लाड आणि क्रांतिसिंह नाना पाटील यांनी केले. क्रांतीकारकांच्या विचारांची आज समाजाला गरज आहे, असे प्रतिपादन वाळवा येथील क्रांतिसिंह नाना पाटील महाविद्यालयाचे मराठी विभाग प्रमुख प्रा. राजा माळगी यांनी केले. बळवंत महाविद्यालयात आझादी का अमृत महोत्सव अंतर्गत क्रांतीअग्रणी जी. डी. बापू लाड यांच्या जन्मशताब्दीनिमित्त 'क्रांतीअग्रणी जी. डी.बापू लाड आणि क्रांतिसिंह नाना पाटील" या विषयावर एक दिवसीय राज्यस्तरीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी माधवराव मोहिते होते. आमदार अरूण लाड, सदाशिव पाटील, व्ही. वाय. पाटील, ॲड. सुभाष पाटील, सुशांत देवकर, उपस्थित होते. आमदार लाड यांनी क्रांतीअग्रणी जी. डी. बापू लाड आणि क्रांतिसिंह नाना पाटील यांनी स्वातंत्र्य चळवळीतील सातारा परिसरातील केलेली क्रांती या विषयावर मार्गदर्शन केले. माधवराव मोहिते यांनी स्वातंत्र्य चळवळीने भारलेल्या क्रांतीअग्रणी जी. डी. बापू लाड आणि क्रांतिसिंह नाना पाटील यांचे विचार आजच्या तरु पिढीला मार्गदर्शक आहेत, असे म व्यक्त केले.



**विटा : चर्चासत्रात बोलताना प्रा. राजा मळगी, यावेळी माधवराव मोहिते.**

Janpravas-02/03/2023

# बळवंत कॉलेजमध्ये २ मार्च रोजी ट्रेड फेअर

**जनप्रवास । प्रतिनिधी**

**विटा :** रयत शिक्षण संस्थेच्या बळवंत कॉलेज मधील कॉमर्स अँड मॅनेजमेंट विभागाच्यावतीने गुरुवार दि. २ मार्च रोजी सकाळी नऊ ते तीन या वेळेत ट्रेड फेअर डेचे आयोजन केले आहे.

महाविद्यालयातील बी.कॉम. व बी कॉम. आय. टी. चे विद्यार्थी उत्स्फूर्तपणे सहभागी होणार आहेत. या ट्रेड फेअरसाठी विविध खाद्यपदार्थ, फ्रुट ज्यूस व रसवंतीचे स्टॉल मांडले जाणार आहेत. काही निवडक उत्पादनाची माहिती विटा शहरातील ग्राहकापर्यंत पोहोचण्याची संधी या निमित्ताने प्राप्त होणार आहे. आजच्या पिढीने उत्पादन विक्रीसाठी आवश्यक असलेले ज्ञान, नवीन तंत्रज्ञान यामाध्यमातून विद्यार्थ्यांना अवगत होणार आहे. या ट्रेड फेअरचे आयोजन प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांच्या मार्गदर्शनाखाली होणार आहे. तरी विटा शहरातील ग्रामस्थ, विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून वेगवेगळ्या उत्पादनाची खरेदी करण्याचे आवाहन प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे, वाणिज्य व व्यवस्थापन विभागप्रमुख डॉ. श्रेया पाटील व प्रा. राणी चव्हाण यांनी केले आहे.

Janpravas-26/02/2023

# विट्यात आज 'सुयेक'चे अधिवेशन

प्रतिनिधी
विटा

बळवंत महाविद्यालयात आज रविवार २६ फेब्रुवारी रोजी अर्थशास्त्र पदवी आणि पदव्युत्तर विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने शिवाजी युनिव्हर्सिटी इकॉनॉमिक्स असोसिएशन कोल्हापूर (सुयेक) यांचे ३३ वे अधिवेशन होणार आहे, अशी माहिती प्राचार्य डॉ. राजेंद्र मोरे यांनी दिली.

याबाबत अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. राहुल म्होपरे यांनी दिलेली माहिती अशी, रविवार २६ फेब्रुवारी रोजी बळवंत महाविद्यालय येथे सुयेकचे ३३ वे अधिवेशन होणार आहे. यात कुक्कुटपालनाचे अर्थशास्त्र आणि आभासी चलन, भास, आभास आणि वास्तव या दोन विषयावर राज्यस्तरीय चर्चासत्र होणार आहे.

अधिवेशनाचे उद्‌घाटन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याहस्ते होणार आहे. यावेळी अखिल भारतीय मराठी अर्थशास्त्र परिषद अध्यक्ष डॉ. आर. बी. भांडवलकर उपस्थित राहणार आहेत. सुयेकची कार्यकारिणी तरूण आणि अध्यक्षही तरुण असल्याने धडाडीने काम केले जात आहे.

या अधिवेशनात १५० शोधनिबंध समाविष्ट होतील. प्रोफेसर, माजी व्यवस्थापन समिती सदस्य, व्यवसायिक, उद्योजक, महिला, अर्थशास्त्र जाणणारे आणि जगणारे असे अभ्यासू मंडळी यांचा सहभाग यामध्ये आहे. हे अधिवेशन महिलांना प्राधान्य देणारे असेल. अधिवेशनाची महत्वाची सूत्रे महिलांकडे असणारे हे इतिहासातील पहिले अधिवेशन ठरेल. कॉलेज आणि प्राचार्यांचे सहकार्य व सांघिक प्रयत्नामुळे अधिवेशन दिमाखदार होईल, असा विश्वास म्होपरे यांनी व्यक्त केला.